**प्रभु तरुण आश्रयदाते**

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तीकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य



तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

www.prabhutarun.com

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :

मिनाक्षी जयकर
मयुरा नायक
संजना कोठारे
वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया



**प्रभु तरुण आश्रयदाते**

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक



**वर्ष ८६ वे) प्रभुतरुण मुंबई, सोमवार, ता. १६ माहे ऑगस्ट, सन २०१० (अंक ९७३**


*संपादकीय*

## सण आनंदाचा

**-सुहासिनी कीर्तिकर**

माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. या समाजघडणीसाठी त्यानं आजवर भरपूर मेहनत घेतली आहे. समाजप्रियता हा आपल्या परभू रक्तात असलेला अणूरेणूच आहे. म्हणूनच अनेक संस्था अनेक कार्यक्रम आखीत असतात. करीत असतात. नेटाने, उत्साहाने. 'प्रत्युश' हा त्याचा ढळढळीत दाखला. 'अभंगयात्रा' चालते दरवर्षी ती याच भावनेने. क्रीडास्पर्धा होतात त्या याच खेळकर निरोगी बाण्याने. विविध स्पर्धा आणि विविध उपक्रम हाती घेतले जातात ते समाजातील सर्वांनी हातात हात गुंफून एकत्र नांदावे म्हणून. या समाजघडणीसाठी माणसानं विचारधनही कमावलं आहे. एकतेतून अनेकता शोधत आणि साधत एकत्वही जपलेलं आहे. 'बहुस्याम्' म्हणत म्हणत त्यानं आत्मविकास साधलेला आहे. त्यासाठी माणसानं अनेक नियम आखले, कायदे केले, व्रतवैकल्ये निर्माण केली. सणउत्सव साजरे केले. या उत्सवांना परंपरा आहे. ऋतुचक्राच्या समांतर साजरे होणारे अनेक सणसमारंभ आणि उत्सव याने आपण परभू नित्य नवे होत असतो, आनंदनिधान बनत असतो. दिसामाशी या उत्सवांमध्ये आणखी आणखी भर पडत चाललीय. मातृदिन म्हणून आपली पिठोरी आहेच. त्या जोडीला वर्षातून एकदा (एकदाच?) 'मदर्स डे' आपण साजरा करतो. 'रक्षाबंधना'ला राखी असते भाऊरायाला. आता त्या पलीकडे जाऊन 'फ्रेंडशिप डे' आपल्या उंबरठ्याच्या आत आलाय. 'मैत्रीदिना'निमित्त रसिक वाचकहो, माझ्या तुम्हा सर्वांना शुभेच्छा. 'प्रभुतरुणा'शी तुमचे नाते असेच घट्ट घट्ट राहू द्या. 'व्हॅलेटाइन डे' बद्दल उलटसुलट चर्चा झाली तरी उत्सवप्रिय तरुणाईला तो खास सणासुदीचा दिवसच असतो. ऋतुचक्राच्या चलत् गतीबरोबर आपल्या उत्सवांना, आनंदाला उधाण येत रहाते.

उन्हाळा सुरू झाला की होळी. पाऊस सुरू झाला की आषाढातला कालिदासदिन. रिमझिमत्या पाऊसखेळात भिजलेला आणि सणांनी रंगलेला श्रावणमास. आश्विनाच्या आगेमागे नवरात्र, दसरा, दिवाळी प्रकाशोत्सव साजरा करतात. त्यात आपण आपसूकच सामील होत आनंदाची देवाणघेवाण करतो. सुखाची लयलूट करतो.

फक्त आनंद नव्हे; प्रेमाची देवाणघेवाण करणे, आत्मीयतेची वृद्धी करणे, वैरभाव विसरणे हेदेखील 'उत्पद्यते-विनश्यते' तत्त्व आपण समाजमन निरोगी ठेवण्यासाठी मानवधर्म म्हणून पाळतो. 'सणासुदीला तरी जरा हसा रे' असे चिंतामुक्त करायला लावणारे संदेश पूर्वी वडील माणसं देत असत. ऋतुमानाला सामोरे जात तणावमुक्त होणं हा माणसाचा नैसर्गिक भाव त्यामागे असतो. त्याविरुद्ध जाऊन रडगाणे गाणे, दुसऱ्याच्या उत्साहाला टाचणी लावत आपल्याच दु:खाची टोचणी लावणे म्हणजे माणसाच्या मनाचे दारिद्र्यच. नेहमीचा 'तोच तो'पणा टाळायचा असेल तर 'टाळ्या वाजवणाऱ्या पानां'च्या जोडीला आपणही टाळी दिली पाहिजे.


(पान २ कॉलम १ वर)


*विस्तारीत संपादकीय*

## प्रेमकहाणी!

**-संजना दीपक कोठारे**

ती येणार हे त्याला माहीत होतं. मैलो प्रवास करून ती शेवटी त्याच्या जवळच येणार होती. अमाप अडथळे आले तरी ती त्यावर मात करून त्याच्यापाशी पोहोचतेच आणि तो अनंतापर्यत तिची वाट पाहात राहतो. अखेरीस ती येते परंतु त्याची भेट घेतल्यावर नाहीशी होते. झिरपून जाते. तेवढाच त्यांचा मिलाप, तेवढाच त्यांचा संगम. परंतु खऱ्या प्रेमाची ग्वाही देऊन जाते

समुद्रकिनारी घडलेली ही त्या लाटेची त्या किनाऱ्याबरोबर जुडलेली प्रेमकहाणी. काही घटकांसाठी का असेना ती उसळती लाट सगळ्या अडथळ्यांवर मात करून मैलो प्रवास करते, त्या अथांग सागराला पार करते ते केवळ त्या क्षणिक आनंदासाठी...त्या निर्मळ भेटीसाठी!!! किती निस्वार्थी आणि पवित्र प्रेम आहे त्या लाटेचं त्या किनाऱ्याशी. तो किनारासुद्धा त्या लाटेची वाट अनंतापर्यंत पाहत असतो. त्या उसळत्या लाटेचा शेवट त्या किनाऱ्याच्या प्रेमाच्या कुशीत जाऊनच होतो. जणू काय तिला मोक्ष त्याच्या भेटीतूनच प्राप्त होणार आहे.

समुद्रकाठी त्या लाटेकडे पाहत असताना विचारांची लाट उसळली. त्यात समुद्राची लाट येत होती आणि झिरपून जात होती. निसर्ग क्षणाक्षणाला मनुष्याला आपल्या आयुष्याची कहाणी दर्शवतो असं वाटायला लागलं. त्या लाटेला कसलीच अपेक्षा नसते त्या किनाऱ्याकडून. केवळ त्याची भेट घडावी म्हणून तिचा जीवतोड प्रयत्न. त्या निव्वळ भेटीतून तिला काय मिळालं हे तिचं तिलाच माहीत. काय मिळालं तिला आपल्या जीवनाचा एवढा त्याग करून? सर्व काही देऊनही ती तृप्त. कसलीही अपेक्षा न बाळगता तिनं स्वीकारलेला मोक्ष. याला खरं प्रेम म्हणता येईल का?

जिथे बघावं तिथे प्रेमाची जणू लाटच आलेली आढळते. एक करतो म्हणून दुसरा करतो आणि दुसरा करतो म्हणून अजूनही इतर सगळेच करतात. बऱ्याच मित्रमैत्रिणींना या प्रेम प्रकरणात अडकलेले पाहिले आहे. तो अनुभव जणू कमी होता की माझ्या कामाच्या संदर्भातही असे दावेदार येत असतात. प्रेमाच्या गोष्टी बऱ्याच केल्या जातात परंतु प्रेमाचा अर्थ कोणाला माहीत असतो तरी की नाही...कळत नाही. कळत नाही म्हणण्यापेक्षा...माहीत नाही असं ठामपणे म्हटलं तरी ते चुकीचं ठरणार नाही.

हल्ली शाळेतील मुले-मुलीसुद्धा गर्लफ्रेंड-बॉयफ्रेंड असण्याच्या गोष्टी करतात हे पाहून त्रास होतो की हल्ली एका पवित्र नात्याला अतिशय किरकोळपणे संबोधलं जातंय. हे म्हणणं अतिशयोक्ती ठरणार नाही की महाविद्यालयीन मुलामुलींना एक गर्लफ्रेंड वा बॉयफ्रेंड आपल्याबरोबर असणं म्हणजे एक सजावटीसाठी असलेली साथ हवी असते. एक अतिशय भयानक अशी गोष्ट हल्ली रेडियोवर ऐकण्यात आली. एक रेडियोवरच्या एका कार्यक्रमात दोन अनोळखी माणसांची भेट घडवली जाते. त्या कार्यक्रमात उमेदवाराला विचारलेले प्रश्न आणि त्यांच्या प्रेमाची व्याख्या ऐकून हसू येतं. त्या व्यक्तीला प्रेमाचा गंधही नसतो, परंतु केवळ एक शारीरिक गरजेसाठी कोणाशीही


(पान २ कॉलम ३ वर)

पान १ कॉलम २ वरून

वाहणाऱ्या झऱ्यांसमवेत आपले मनही दुडदुडत वाहिले, झरले पाहिजे. यासाठीच असतात ना आपले सण आणि उत्सव?

म्हणून तर गणपती उत्सवाला लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक अधिष्ठान दिले. संघभावना जोपासली. आनंद वाढवला. जनजागृती केली. विचारधनाची लूट केली. अशावेळी आपण उत्सवी वृत्तीबरोबरीने या संघभावनेचा आदर करायला हवा. विचारांचे जागरण करायला हवे. प्रदूषणाला 'कुपोषित' ठरवायला हवे. अशावेळी अध्यात्मिक धर्मभावना आणि राष्ट्रधर्मभावना यांचा घोळ न घालता राष्ट्रधर्म उत्सवांतूनच जोपासला पाहिजे. राष्ट्रधर्म हा 'स्वर्गादपि गरीयसि' असलेल्या मातृभूमीला वंदन करतो. तिचे स्वत्व जपतो आणि त्याला नैतिक अधिष्ठान प्राप्त करून देतो. बरं, राष्ट्रधर्म पाळण्यासाठी अनेक सणउत्सवांसारखे खूप काही करावे लागत नाही. 'हुतात्मा दिन' पाळायचा. राष्ट्रनेत्यांचे, त्यांच्या कार्याचे स्मरण करायचे. आपलेच शहर, आपला परिसर स्वच्छ ठेवायचा. ध्वनिप्रदूषण, वायूप्रदूषण, जलप्रदूषण प्रत्येकाने आपल्यापुरते टाळायचे. श्रावणाच्या हातात हात घालून येणाऱ्या स्वातंत्र्यदिनाला प्रत्येकाने वर्षातील महत्त्वाचा दिवस मानायचे. पण आज चित्र काय दिसते? 'पंधरा ऑगस्ट' हा स्वातंत्र्यदिन न मानता फक्त 'सुट्टीचा दिवस' मानला जातो. सरकारी मुख्य कचेऱ्या, शाळा, काही अपवादात्मक सहकारी गृहसंस्थामधून हा दिन साजरा होतो. पण महाविद्यालयात ते काम फक्त जणू 'एन्सीसी' वाल्यांचे. पाडव्याला गुढ्या घरोघरी उभारल्या जातात. (आता तर दिवाणखान्यातही 'मिनी' गुढ्या उभारतात) तसे राष्ट्रध्वज फडकत ठेवले जातात का? माझे बाबा न चुकता सत्त्व आणि तत्त्वनिष्ठ खादीचा तिरंगा घराच्या गच्चीवर उभारायचे. सायंकाळी तो उतरवून बासनात बांधून ठेवणीतल्या कपड्यात व्यवस्थित घडी घालून ठेवायचे. हे पूर्वी सर्रास असणारे चित्र आज दुर्मीळ झाले आहे. ठीकाऽऽय्. पण निदान सायंकाळी याच ध्वजांना कागदाचा कपटा बनवून पायदळी तरी तुडवू नका. ते आपल्या राष्ट्रधर्मात निषिद्ध माना. कुठेही, केव्हाही राष्ट्रगीत वाजले तर प्रतिक्षिप्त क्रियेसारखे पटकन् उठून उभे रहा. मानवंदना द्या. असं नाही घडलं तर?

तर... तर ती आपणच 'मूलेकुठार' सारखी आपली एक 'कसाब'करणी ठरेल!

पान १ कॉलम २ वरून

तात्पुरतं नातं जोडायची तयारी असते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही कबुली द्यायलासुद्धा त्यांना कसलीच लाज वाटत नाही. परंतु राग या गोष्टीचा येतो की या भावनांना 'प्रेम' का म्हणावं?

'I Love You.' या तीन अतिशय सुंदर शब्दांचा प्रयोग हल्ली इतक्या सहजरीत्या केला जातो की त्याचं महत्त्व कमी होत चाललंय आणि या शब्दांचा खरा अर्थ कोणी जाणून घेतच नाही. भावनात्मक प्रेमापेक्षा शारीरिक आकर्षणाला महत्त्व दिलं जातं. यात 'प्रेम' कुठेतरी लुप्त झाल्यासारखे वाटतं कारण जर केवळ भावनात्मक प्रेम असेल तर शारीरिक आकर्षणाकडे दुर्लक्ष करूनसुद्धा प्रेम दर्शविता येतं, असा अनुभव येऊ शकतो.

केवळ एकमेकांना पाहून आपण एकमेकांसाठीच बनलो आहोत असा निष्कर्ष लावला जातो याला शारीरिक आकर्षण म्हणावं की प्रेमात पडण्याचे केवळ एक आकर्षण? आपली कोणी गर्लफ्रेंड, बॉयफ्रेड असणं हेच त्यांच्यासाठी एक मोठा पराक्रम केल्याप्रमाणे असतं. आपल्याला एखाद्या व्यक्तीकडून इतरांपेक्षा जास्त महत्त्व मिळावं याच अपेक्षेत हल्लीची नाती बनतात ज्यात स्थिरता नाही, 'प्रेम' नाही. या व्यक्तीची खरी ओळख पटल्यावर कळून चुकतं की आपण एकमेकांबरोबर पूर्ण आयुष्य घालवू शकत नाही. शेवटी प्रेमाचे गीत गाणारे प्रेमी आपल्या जागा बदलतात कारण तोपर्यंत एखाद्या नवीन व्यक्तीसाठी आपल्या आयुष्यात जागा बनवली गेली असते. नवीन नातं बनवूनसुद्धा आधीच्या अनुभवापासून वेगळं या नात्यात काहीच नसतं कारण जिथे खरं प्रेमच आढळून येत नाही ते नातं टिकून राहणे शक्य नाही.

खऱ्या प्रेमाची परिभाषाच सगळे विसरलेले दिसतात. खरं प्रेम कधीच एवढं उथळ नसतं आणि ते कोणत्याही कारणास्तव बदलत नाही. मुख्यत: प्रथमदर्शनी जे प्रेमात पडण्याचं आश्वासन देतात तेच मूळात खोटं बोलत असतात असं मला वाटतं. याचं कारण की एखादी व्यक्ती आपल्याला प्रथमदर्शनी आवडू शकते, परंतु प्रेमात पडायला त्या व्यक्तीला ओळखणं फार गरजेचे आहे.. एकमेकांना ओळखण्यासाठी एखादी वेळ नसते की इतकी वर्षे झाली तरच ओळख पटते. एकमेकांच्या भावनात्मक गुंतवणुकीवर त्यांची ओळख पटते. एकमेकांचे गुणदोष जाणूनसुद्धा जर त्याच व्यक्तीचा सहवास आवडत असला, भांडणं करूनसुद्धा त्याच व्यक्तीशी चोवीस तास बोलण्याची इच्छा राहिली तर त्याला प्रेम म्हणू शकू. नाही का?

आपल्याला बरीच माणसं आवडतात परंतु प्रेम सगळ्यांवर होत नाही. 'प्रेम'हा शब्द किती सहज आणि किरकोळपणे वापरला जातो की त्याचं पावित्र्य नाहीसं करून टाकलंय. प्रेम दर्शवण्यासाठी भौतिक लेन-देन करण्याची आवश्यकता नसते हे कोणी का नाही जाणले? कोणासाठी वाट्टेल ते करण्याची मनाची तयारी असणं प्रेमाचं प्रतिक नाही का? परंतु सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रेम कोणत्याही अटीशिवाय असावं. निस्वार्थी आणि निर्मळ. कोणावरही प्रेम केलं म्हणजे त्यांनीसुद्धा आपल्यावर प्रेम केलं पाहिजे असा अट्टाहास का? यामुळे प्रेम नाही परंतु एखादा व्यापार केल्याची भावना येते. तू माझ्यावर प्रेम केलंस तर मी तुझ्यावर प्रेम करीन हा विचारच मूळात दर्शवतो की याला प्रेम म्हणताच येणार नाही. मग प्रेम कशाला म्हणतात? कोणी आपल्यासाठी काही करावं अशी अपेक्षा नसतांना त्या व्यक्तीसाठी निस्वार्थीपणे वाट्टेल ते करण्याची तयारी असणं म्हणजेच 'पवित्र प्रेम' नाही का?

प्रेमाची परिभाषा खूप कठीण आहे असं कोणी म्हणेल; परंतु मला वाटतं प्रेमाची भावना सगळ्यात सरळ आणि सोपी आहे. प्रेम आणि विश्वास या दोन गोष्टी आहेत ज्या अजिबात गुंतागुंतीच्या नाहीत. विश्वास शंभर टक्के असू शकतो किंवा शून्यही असू शकतो, असं मला वाटतं. त्याचप्रमाणे 'प्रेम'शंभर टक्के असू शकते किंवा

(पान ३ कॉलम ३ वर)

## Senior Citizens and Distressed Pathare Prabhus

To,
The Trustees,
Prabhu Tarun.

Sub: Senior Citizens and Distressed Pathare Prabhus

Dear Sirs,

Prabhu Tarun has emerged as a vibrant organization that is harnessing the talent of the community and giving them a platform to express themselves. Most of these activities are happening at the youth level and this is extremely important because the youth are the future. Prabhu Tarun deserves compliments for the same.

However, we have people of different ages and all belong to our community. As a responsible body, I wish to bring to light certain issues pertaining to our community where Prabhu Tarun should contribute and make itself useful not merely in organizing cultural events but also towards uplifting the weaker section of our community.

To take a test case, we had in our community Dr. Keshavrao Jaykar of Charni Road. A renowned neurologist of his time. He had three daughters. At present the three daughters are living in utter misery. The eldest is a widow with no children and the other two are unmarried. The parents are long dead and gone. All three are now senior citizens and are struggling to eke out a decent living.

Recently the eldest daughter fell and broke her thigh bone at the hip joint (neck-femur) which required a ball replacement. What came to light at this juncture was that the sisters neither had the finances nor the wherewithal to take care of this mishap. While they found assistance in this particular instance and the elder sister is recuperating in the hospital, it throws open a vista that could be an opportunity for good Samaritans in our community to extend themselves to assist in such cases, either financially or by way of community service, like being available physically to attend to the needs of the patient while in the hospital or while recuperating. The issue does not end there. Senior citizens have a huge void facing them, especially if they do not have family around them. Should our community abandon them? Should they be allowed to whither away unattended?

The youth of our community is vibrant and responsible. With the support of able adults, can Prabhu Tarun start a venture that will enable the weaker lot in our community to live in dignity without being left to the whims and fancies of neighbours who may not belong to our community. Can Prabhu Tarun make an appeal to the community to come forward **<u>in specific cases</u>** to assist at the time of need. This will be quite different from the Pathare Prabhu Charities which is a legally constituted body to look into such matters but has a lot of red tape and bureaucracy to cross before the help is rendered. Sometimes, the urgency of the case requires immediate attention. Sometimes there is a rehab process that can take a variable amount of time. Sometimes, there is a need to offer advise/counselling/ assistance to the concerned person, especially in matters of organizing finances for post operative days and the future.

Maybe Prabhu Tarun can form an "Assistance Cell" which can have resources at their disposal in terms of contacts to be able to help the needy. Maybe a **<u>24 hour helpline</u>** where "someone" can be reached in times of distress. These are some stray thoughts and a lot of brain-storming will be required to formulate a workable scheme.

I thought that maybe a seed (of thought) should be planted in our Yuva Manch so that besides entertainment and cultural events, we also provide a platform to our youth to become more responsible socially and also community conscious.

Hoping that the Board of Prabhu Tarun will consider this matter seriously and come up with a viable solution.

Thanking you and with warm regards.

**-- Pravin Manker**

●

किस्से कोर्टातले-

# मिशेलची गोष्ट

-सौ. बागेश्री योगेन परीख

(गेल्या अंकातील लेखात एक समस्या मांडली होती. त्यावरची वाचकांची प्रतिक्रिया किंवा समस्येवर तोडगा बागेश्रीताईंना वाचकांनी कळविणे अपेक्षित होते. अजूनही वेळ गेलेली नाही. त्यांना उत्तर जरूर जरूर कळवा. पुढील अंकी न्यायाधीश म्हणून त्यांनी घेतलेला या समस्येवरचा निर्णय येईलच.

**-संपादक)**

पोटगी किंवा मेन्टेनन्सच्या केसेस कुटुंब न्यायालयात प्रचंड प्रमाणात दाखल होतात. तशा त्या हाताळायला सोप्या असतात. पण काही केसेस इतक्या संवेदनाशील असतात की, कायद्यापेक्षा भावनिक आधार देऊन त्या सोडवाव्या लागतात.

क्रिमीनल प्रोसिजर कोडच्या १२५ कलमाखाली पत्नी, मुले अथवा वृद्ध आईवडील, ज्यांना उत्पन्नाचे साधन नाही; त्यांना त्यांच्या कमावत्या नवऱ्याकडून, मुलाकडून अथवा पित्याकडून पोटगी मागण्याचा हक्क असतो आणि ह्या सर्व केसेस कुटुंब न्यायालयात दाखल होतात.

मिशेलची केस काहीशी वेगळी होती. तिने ३ वर्षांच्या सॅमसाठी मेन्टेनन्स मागितला होता. तिचं आडनाव गोम्स लिहीलं होतं; तर प्रतिवादीचं नाव शेखर पटेल असं होतं. समन्स मिळूनही शेखर पहिल्या तीन चार तारखांना कोर्टात हजर राहत नव्हता. मिशेल छोट्या सॅमला घेऊन कोर्टात यायची. शेखरची आतुरतेने वाट बघायची आणि हिरमुसली होऊन निघून जायची.

अखेर तिने कोर्टाकडे आपली कैफीयत मांडण्याची इच्छा दर्शवली. मिशेलची केस मन हेलावून टाकणारी होती. मिशेलचं शेखरशी लग्न झालंच नव्हतं. ती त्याच्या ऑफिसमध्ये त्याची सेक्रेटरी म्हणून काम करीत होती. ओळखीचं रूपांतर प्रेमात झालं आणि मिशेलला दिवस गेले. मिशेल अविवाहीत होती. पण शेखरचं लग्न झालेलं होतं. त्यामुळे मिशेलचा स्वीकार करणं शेखरला शक्य नव्हतं. जास्त गवगवा होऊ नये म्हणून मिशेलने नोकरी सोडली व ती गोव्याला निघून गेली. शेखरनेपण तिची काहीच चौकशी केली नाही.

कालांतरानं सॅमचा जन्म झाला. स्वत:च्या हिकमतीवर सॅमला मोठं करायचं आणि तेसुद्धा कुणाच्याही मदतीशिवाय; हे मिशेलचं स्वप्न होतं. पण दैव काही वेगळंच होतं. मिशेलला जाणवलं की तिची तब्येत दिवसेंदिवस खालावते आहे.

डॉक्टरांच्या निदानाप्रमाणे तिला ब्लड कॅन्सर झाला होता. होते नव्हते ते पैसे तिने औषधोपचारावर खर्च केले. जेव्हा तिला कळून चुकले की आता आपण फार काळ जगणार नाही; तेव्हा ती मुंबईस आली आणि तिने सॅमसाठी शेखरच्या विरुद्ध मेन्टेनन्सची केस केली.

आजपर्यंत मिशेलने तिच्या आईलापण सांगितलं नव्हते की, सॅमचे वडील कोण आहेत. तिला शेखरला दुखवायचं नव्हते. त्याचा संसार उध्वस्त करायचा नव्हता. पण तिचा नाईलाज होता. तिच्यानंतर सॅमची व्यवस्था लावण्यासाठी तिला पैशांची गरज होती व अनौरस असला तरी सॅम शेखरचा मुलगा होता.

शेखरला समन्ससुद्धा त्याच्या ऑफीसच्या पत्यावर पाठवलं गेलं. बरेच दिवस वाट पाहून समुपदेशकांनी शेखरशी संपर्क साधला व त्याला कोर्टात येण्याची विनंती केली.

शेखर एकटाच कोर्टात आला. त्याच्या मनातलं गिल्ट त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होतं. सॅमकडे थोडावेळ तो एकटक पाहत राहिला. निरागस सॅमला मात्र काय चाललंय ह्याची पुसटशीसुद्धा कल्पना नव्हती. आईचा हात धरून तो इथे तिथे फिरत होता. सॅमला पाहून शेखरला तात्पुरते दु:ख झालं. पण त्याने सॅमला अव्हेरलं नाही. तसं पाहायला गेलं तर मिशेलकडे त्या क्षणाला सॅम शेखरचा मुलगा आहे हे सिद्ध करायला काहीच पुरावा नव्हता. कागदपत्र नव्हती. एकमेकांना लिहिलेली प्रेमपत्र नव्हती. शेखर तिला कुठे भेटायचा ह्याचा तपशीलही नव्हता. साक्षीदार नव्हते. सॅमचं नावसुद्धा तिने तिच्या वडिलाचं लावलं होतं. डीएनए वगैरे करायला तिच्याकडे तेव्हढा वेळही नव्हता व पैसाही नव्हता.

पण शेखरने कुठलाही वकिली सल्ला न घेता, सॅम त्याचाच मुलगा आहे हे कबूल केलं. पण मिशेलच्या आजाराविषयी कळूनसुद्धा सॅमला स्वीकारून स्वत:चं वैवाहिक आयुष्य व समाजातील स्थान धुळीला मिळवायला शेखर तयार नव्हता. इनफॅक्ट तो कोर्टात आला आहे हे सुद्धा कुणाला कळता कामा नये ह्याची खबरदारी शेखरने घेतली होती.

मिशेलला शेखरचं आयुष्य उध्वस्त करण्यात रस नव्हता. तिला फक्त सॅमच्या आयुष्याची चिंता होती.

समुपदेशकांच्या तीन चार भेटीनंतर शेखर सॅमसाठी काहीतरी रक्कम द्यायला तयार झाला. त्याची अट एव्हढीच होती की हे कुणालाही कळता कामा नये व ही केस तिथेच मिटवली जाईल.

मिशेलला पण कुठलीही अट शेखरवर लादायची नव्हती. तिच्यानंतर सॅमला एखाद्या बोर्डींग स्कूलमध्ये दाखल करायचे व त्याचा खर्च शेखरनी करायचा, एव्हढीच तिची इच्छा होती.

शेखरने बऱ्याच विचारांती ५ लाख रुपये नकद मिशेलच्या स्वाधीन केले व आऊट ऑफ कोर्ट सेटेलमेंट केलं.

पुढे मिशेलचं काय झालं, काहीच कळायला मार्ग नव्हता. कारण तिने स्वत:चा काहीच मागमूस ठेवला नव्हता.

कोर्टाच्या रेकॉर्डमध्ये शेखरने दिलेल्या रकमेचा कुठेच उल्लेख नाही. त्याला तसं नकोच होतं. दोघांनीही कुठेही consenterms केल्या नव्हत्या, लिखाण नव्हतं, की पोच पावतीसुद्धा नव्हती.

केस क्लोज करताना एव्हढाच रिमार्क आहे की petition is dismissed for want of prosecution.'

तर अशाही केसेस येतात, ज्या वेगळ्या रीतीने हाताळाव्या लागतात. यात कोण बरोबर, कोण चूक असा उहापोह करायलापण जागा नसते. जगरहाटीचा एक भाग म्हणून हे सर्व स्वीकारावं लागतं.

एव्हढंच पहायचं असतं की कुणा एका व्यक्तीवर अन्याय तर होत नाही ना?

---

(पान २ कॉलम ४ वरून)

अजिबात नाही. प्रेम नसणं म्हणजे ती व्यक्ती आवडत नाही असंही नाही, कारण आवड आणि प्रेमात एक बारीक रेषा आहे,जी पार होते केवळ काही विशिष्ट व्यक्तींसाठी.

प्रेमाची पावती फक्त प्रेम अनुभवणाराच देऊ शकतो...प्रेम करणारा नाही. जो खरं प्रेम देतो त्याला केवळ देणं माहिती असतं...तो हिशोब मांडत नाही. ते प्रेम अनुभवलंच गेलं नाही तर त्या प्रेमात कसली तरी कमी असावी. त्यामुळे देणाऱ्यापेक्षा घेणाऱ्याला कळतं की प्रेमाची परिभाषा काय आहे.

प्रेम म्हणजे केवळ आपलं सर्वस्व देत राहणं आणि परतफेडीची अपेक्षा न बाळगणं.याचमुळं बरेचदा असं आढळून येतं की एक व्यक्ती दुसऱ्यापेक्षा अधिक प्रेम करते. या प्रेमाला कसलाच आधार लागत नाही... केवळ सोबत लागते. त्याला त्या एका व्यक्तीचा आधार लागतो जिच्या सोबतीमुळे ती व्यक्ती कोणत्याही अडथळ्याचा सामना हसतमुखाने करू शकते. म्हणूनच चंद्रशेखर गोखले म्हणतात, 'तू सोबत असलीस की मला माझाही आधार लागत नाही. तू फक्त सोबत राहा. मी दुसरं काही मागत नाही.'

आधार आता केवळ आठवणींचा. त्या समुद्राकडे पाहात राहावसं वाटत होतं. परंतु तोपर्यंत बऱ्याच आठवणी साठल्या होत्या. ती आली, आणि आपल्या बरोबरीने त्या किनाऱ्यावरच्या वाळूला उत्तेजन देऊन त्यांच्या भावना जागृत केल्या. जिथे पाहावं तिथे आठवणी. किनारा त्या लाटेच्या आठवणी घेऊन अनंतापर्यंत तिथेच राहिला आहे कारण आता तिच्या आठवणीतून सुटका नाही. शेवटी मी आपल्या आठवणींचं गाठोडं बांधलं आणि किनाऱ्याच्या वाळूतून चालत घरी यायला निघाले. तिथली वाळू पायाला चिकटत होती, ती हातानी झाडून काढायला जाताच स्वत:ला थांबवले. त्या लाटेची आणि त्या किनाऱ्याची भेट माझ्या पायाला एका स्मरणार्थ जतन केलेल्या वस्तूसारखी चिकटली होती. त्यांच्या याच प्रेमकथेत भिजून जायची इच्छा झाली आणि त्या अमर प्रेमाशी एकरूप होऊन त्यांचं पवित्र प्रेम अनुभवल्याचा आनंद मिळाला.

---

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



Together Towards Tomorrow

# आईचा घो! मूळ मुंबईकर गेले कुठे? ...

-चारुदत्त नवीनचंद्र धैर्यवान

मुंबईचा इतिहास पाहता, मुंबईत शेकडो वर्षांपूर्वी राजा बिम्बदेवाबरोबर जी प्रजा ह्या बेटावर येऊन स्थायिक झाली त्यातलाच एक बहुसंख्य समाज म्हणजे आपण ''पाठारे प्रभू''. हे आपण आपल्या मित्रपरिवाराला आवर्जून सांगतो. त्याकाळी बहुसंख्य असलेले हे मूळ मुंबईकर सध्या या नगरीत अल्पसंख्यांक झाले आहेत. पूर्वी ही सर्व मंडळी गिरगावपासून खारपर्यंत राहायची आणि आता विस्तारीत चाललेल्या ह्या महानगरीत विखुरली गेली आहेत. पूर्वी हा समाज आपले प्रत्येक सण एकत्रित येऊन साजरा करीत असे. पण आता ते एकत्रित येणे अशक्य झाले आहे. त्यामागची कारणे म्हणजे एकतर सर्वजण आता पार एकमेकापासून दूर राहू लागली आहेत आणि कदाचित सर्वांना आपापल्या व्यवसाय-नोकरीमुळे आणि मुख्य म्हणजे ह्या नगरीच्या "FAST LIFE STYLE मुळे शक्य होत नसावे.

ह्या सर्व अडचणींवर मात करत आपल्या ज्ञातीतील काही मंडळीं आपल्या परीने पाठारे प्रभू चॅरिटीझ, प्रभुतरुण, प्रभुप्रभात, हौशी कला मंदिर आणि इतर माध्यमातून सतत काही ना काही कार्यक्रम आयोजित करून सर्वांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करतात. त्यांचे प्रयत्न खरंच कौतुकास्पद आहेत. पण हा विखुरलेला पाठारे प्रभू समाज सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहू शकत नाही. त्यामुळे बऱ्याच कार्यक्रमांना फार थोडी मंडळीच दिसतात.

आज आपण पाहतो की बहुतेक जाती/समाज संघटीत होऊन आपल्या अस्तित्वाचा बचाव करत आहेत. पण आपण पाठारे प्रभू कदाचित दहा हजारांहून जास्त देखील नसूनही हा समाज अजून कुठेच संघटीत होऊन लोकांना हे सांगत नाही की, 'अरे आम्ही मूळ मुंबईकर आहोत, भूमीपुत्राचा हक्क खरा तर आमचा आहे.' मध्यंतरी ''मी मुंबईकर'' वरून बरीच चर्चा, वादळं झाली, पण त्यात जी मंडळी नारा ठोकत होती त्यात कुणी ह्या मूळ मुंबईकरां (पाठारे प्रभू)बद्दल काहीच बोलली नाही. कदाचित त्यांना हे माहीतही नसेल आणि त्यांना सांगणारा कुणी नसेल. कारण 'मी मुंबईकर'चा टाहो फोडणारी मंडळी परप्रांतीय (म्हणजे मुंबई बाहेरची) होती ज्यांना मुंबईवर हक्क गाजवायचा आहे.

आज जर आपण पाहिले तर मुंबईच्या जमिनीचे मालकी हक्क कुठल्यातरी पर-प्रांतीयाच्या नावे असतात. पण त्यातल्या बऱ्याच जमिनीच्या कागदपत्रात मूळ मालक म्हणून पाठारे प्रभूच आढळून येतो. आज जमिनीचे भाव इतके वाढले आहेत की विचारू नये आणि सांगूही नये. ह्याच जमिनी जेव्हा मूळ मालकाकडे होत्या तेव्हा त्याला काहीच किंमत नव्हती. हे कसे काय?

जरा विचार करूया. सध्याचे आघाडीचे ``Business Tycoons" आज त्या ठिकाणी कसे काय पोहोचले? कदाचित त्यांनी आपल्या कंपनीचे भागभांडवल गुंतवणूकदारांना विकून आपल्या धंद्यात लावले आणि आपला धंदा वाढविला. त्यात पैसे गुंतविणार कोण? तर तो समाज म्हणजे इथला नोकरदार वर्ग. कुठून आणले पैसे? कदाचित वडिलोपार्जित असलेल्या जमिनीचे मालकी हक्क विकून. कारण काय? तर जमिनीच्या मालकी हक्कापेक्षा पैसे कमावलेले बरे. काय मिळवले? पैसे गुंतवले आणि मग त्याची वाढ कशी होते ते पाहात राहिले आणि आपला ``Financial Asset" मोठा करत बसले. पण त्यात आपल्या जमिनीचे मालकी हक्क गमावले आणि त्याच जमिनीची आजची किंमत दामदुप्पट वाढली. कशी काय वाढली? जर आपण थोडा आणखी विचार केला तर असे दिसेल की आपल्या पैश्यांनी त्या कंपनीला एवढा फायदा झाला की त्यां त्याच पैश्यांनी जमिनी विकत घेत राहिल्या आणि आता त्याच्या सात पिढ्या बसून खातील एवढी संपत्ती बनवली. अरे! जेव्हा तो आला म्हणे तेव्हा त्याच्या खिशात पाच रुपये होते आणि आज त्याची पुढची पिढी अर्ध्याहून अधिक मुंबईची मालक आहे. अगदी आयपीएलच्या मुंबई इंडियन टीमचीसुद्धा....

ह्या लोकांनी पूर्वीच्या मुंबईचा असा काही कायापालट केला की जागोजागी तुम्हाला नवीन इमारती दिसतात. पूर्वी जिथे मिल होत्या तिथे आता मॉल आहेत. जिथे पूर्वी मिल कामगारमधील चाकरमानी राहात होता तिथे आता उच्चभ्रू श्रीमंत राहतो ज्याला तो मिल कामगार तिथे नको आहे आणि त्यांना तिथून दुसरीकडे जायला लावतात. मग हा मध्यमवर्ग प्राणी आपल्याला परवडेल अशा ठिकाणी एक घर (Flat) घेऊन राहतो. अर्थात ते मुंबईच्या बाहेर वसत चाललेल्या वसाहतीत म्हणजे दहिसर आणि मुलुंडच्या पुढे वीस किलोमीटर अंतरावर. काही मुंबईकर ह्याच शहराच्या उपनगरीत एका चौकोनी वास्तूत आपले जीवन

(पान ६ कॉलम ४ वर)

# Two Clowns from Mumbai performing live in New Zealand

-Ajit Mankar

This year in January our two families ( self and wife Tejasweeni alongwith Satish and Ranjana Dharadhar ) paid a visit to our common friend Vijay and Suneeta Bhosale stationed in Auckland,New Zealand.A day's excursion led us to the small town of Hamilton.After visiting the important tourist attractions,we reached the famous international garden of Hamilton.This is a scenic huge garden with many sections attributed to types of gardens of different countries.For example,there is a replica of our own Kashmir garden,besides that of typically English,German,French, local Maori,Italian,Japanese etc.styles of gardens .

After the whole day's roaming,we were all really tired and decided to rest for a while in the last garden on our agenda ie. the Japanese Garden.This was a really picturesque garden with a small artificially created pond and ducks leisurely swimming in the pool of fresh water.The surrounding was beautiful and serene beyond compare.In the middle of the garden, there was a structure depicting a Japanese pagoda.Satish and self,we both sat down in a corner inside the cool hall viewing the out of the world beauty of nature around us. Before we could guage what is happening,our two ladies promptly captured the place on the prayer dias taking the fake poses of devotees with their eyes closed and palms joined for prayers and suddenly started chanting Oam in loud and syncronised voices.It was quite a shock for us two poor husbands.

Of course,there were a number of groups of European and American tourists that flocked in after us. Their reaction was typically the same.At the entrance itself,they used to be hesitant, and in two minds whether to enter the arena or not,on hearing the enchantment of Oam by our two ladies at the top of their voices.To their dislike,they used to think that some kind of religious rituals are being performed inside.However,with some discussions among themselves,they used to equate some courage and enter observing absolutely pin drop silence,and within minutes involuntarily rushing out not clicking even a single photograph of the scenic nature around.

And finally there came a group of small family of Oriental origin looking like Japanese or South Koreans.They first stumbled at the entrance like others,no doubt,but quickly made an entry inside.They seemed to be really pleased with the enchantment of our ladies,not realising it was simply a joke as far as the performers were concerned.They were at ease in their movements inside and clicked photographs to their heart's content both of the nature around as well as our ladyfolks with their sadhwi-like poses.Before leaving,the eldest couple came to meet us and repeatedly bowed to us.We reciprocated in their own style.The old boy smilingly uttered "From India?".We replied "Yes Sir". He then shook hands and said "Korea".Then the whole party left the hall smiling and waving to us as a gesture of good-will.

We then packed off and headed for Auckland as it was quite late by then.Over the drink session at Vijay's house (our host ) that night,everyone enjoyed the joke of the Hamilton Japanese garden.

●

# अमेरिकेतलं पहिलं विश्व मराठी नाट्य संमेलन

**-नीलिमा सुजन राणे**



छायाचित्रात मोहन व स्मिता जयकर आणि नीलिमा व सुजन राणे

अखिल भारतीय नाट्य परिषदेचं पहिल्यांदाच विश्व मराठी नाट्य संमेलन भारताबाहेर अमेरिकेत न्यू जर्सीत २८ ते ३१ मेपर्यंत भरले होते. ह्या संमेलनाशी मी एकुलती एक पाठारे प्रभू व्यक्ती निगडीत असल्यामुळे मला अभिमानाने प्रभुतरुणासाठी त्याचा थोडक्यात आढावा घ्यावासा वाटतो. यापूर्वी या संमेलनाशी काही पाठारे प्रभू व्यक्तींचा संबंध भारतात आलेला असणार यात शंका नाही. कारण आपली जात नाट्यप्रेमी आहे हे सांगायला नको. या संदर्भात अभिमानाची गोष्ट सांगायची म्हणजे माझ्या वाचनात आलं की बॅरिस्टर मुकुंदराव जयकरांसारखी नावाजलेली पाठारे प्रभू व्यक्ती पुण्याला १९१८ साली भरलेल्या अखिल भारतीय नाट्य परिषदेची संमेलनाध्यक्ष होती. हे अमेरिकेचे संमेलन फिलाल्डेल्फियाच्या डॉ. मीना नेरुरकर यांच्या पुढाकाराने भरवण्यात आलं हे नमूद करावं लागेल. मराठी रंगमंचाशी संबंध ठेवणे हा वारसा मला माझ्या आईकडून म्हणजे लता राणेकडून आला असं सांगणं उचित ठरेल. दिलीप प्रभावळकरांच्या 'जावई माझा भला' आणि अशा काही नाटकात, टी. व्ही. सिरियल्स व सिनेमात काम केल्यामुळे भारतातून येणाऱ्या त्या क्षेत्रातील बऱ्याच कलाकारांशी माझा परिचय होता. त्यामुळे कार्यक्रम व भोजन व्यवस्था समित्यांनी माझ्यावर पुष्कळ जबाबदारी टाकली होती व ती मी आनंदाने पार पाडली. इतक्या दिवसांनी मुंबईतल्या कलाकारांशी गप्पागोष्टी व मस्करी करण्यात वेळ अगदी मजेत गेला.

अमेरिकेतल्या अनेक मराठी मंडळांकडून बरीच नाटकं व एकांकिका आल्या होत्या, त्या सगळ्या वाचून त्यांचे व्हिडिओ पाहून ती भारतातून येणाऱ्या कार्यक्रमाच्या तोडीच्या आहेत की नाही, हे ठरवायचं काम फार जिकीरीचं होतं. शेवटी आम्ही सर्वांनी जी नाटकं आणि एकांकिका निवडल्या त्यात इथल्या कलाकारांनी शुक्रवारी २८ मेला 'घर दोघांचे' 'मुक्तिधाम' ह्या अतिशय सुंदर एकांकिका सादर केल्या. तर शनिवारी २९ मेला महाराष्ट्राची परंपरा दाखवण्यासाठी कार्यक्रम सकाळी दिंडीने सुरू झाला. बायका जरीच्या साड्या नेसून, तर पुरुष डोक्याला फेटे बांधून ताशांच्या गजरात रस्त्यावर नाचत नाचत नाट्यगृहाकडे सरकत होते. काही बायका त्या दिंडीच्या प्रोसेशन्समध्ये चक्क फुगड्या घालत होत्या. हे दृश्य पाहून मन भरून आलं. क्षणात वाटलं आम्ही सर्व महाराष्ट्रात आहोत. वाटलं आपली ही जुनी संस्कृती किती समृद्ध आहे, ती अशीच शतकानुशतकं चालावी ही ईश्वरचरणी प्रार्थना. त्यानंतर कार्यक्रम होता मुलाखतीचा. जी पहिली मराठी स्त्री १८८३ साली इथे डॉक्टर व्हायला आली ती डॉ. आनंद जोशी. कार्पेंतर नावाच्या ज्या अमेरिकन कुटुंबामध्ये ती राहिली होती त्या कुटुंबातली वृद्ध पणती नॅन्सी ष्टोन हिची डॉ. मीना नेरूरकराने घेतलेली मुलाखत. ह्या बाईने डॉ. आनंदी जोशीच्या काही वस्तू अजून जपून ठेवल्या आहेत हे ऐकून डोळ्यात पाणी आलं. त्यानंतर भारताचे कृषीमंत्री श्री. शरद पवार व महाराष्ट्राचे एक मंत्री श्री. पाटील व अशा मान्यवर व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. भारतातून आलेलं 'यु टर्न' नाटक. यात डॉ. गिरीश ओक व इला भाटे या दोघांनी अप्रतिम कामं करून प्रेक्षकांची मने जिंकली. महाराष्ट्रातून जे कलाकार आले होते त्यापैकी जयंत सावरकर, मोहन जोशी, वंदना गुप्ते, भारती आचरेकर, विजय कदम, डॉ. गिरीश ओक, इला भाटे, रमेश भाटकर व प्रशांत दामले या सर्वांनी 'मराठी नाटकांची परंपरा' या कार्यक्रमात मराठी नाटकातले छोटे छोटे प्रवेश सादर करून विनोदाचा उच्चांक गाठला. इथे एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो, ती म्हणजे आपल्या जातीतले मोहन जयकर आणि प्रसिद्ध अभिनेत्री स्मिता जयकर या दोघांनीसुद्धा ह्या संमेलनाला हजेरी लावली होती. त्यांच्याबरोबर भोजनाच्या एका खाजगी कार्यक्रमात गप्पागोष्टी करण्यात वेळ कसा निघून गेला कळलं नाही. शनिवारी ३० मेला इथल्या कलाकारांनी 'बुमरँग' नावाचं नाटक परिणामकारक केलं. त्याच दिवशी महाराष्ट्रातून आलेलं 'बेगम बर्वे'. यात चंद्रकांत काळे यांनी 'मम आत्मा गमला', 'वद जाऊ कुणाला शरण ग' ही बालगंधर्वांची गाजलेली नाट्यपद फार तयारीने गाऊन बालगंधर्वाची मूर्ती डोळ्यासमोर आणली. त्या रात्री पुरुषोत्तम दारव्हेकर लिखित 'कट्यार काळजात घुसली' यात चारुदत्त आफळे व ऋषिकेश बडवे यांनी पूर्वीच्या वसंतराव देशपांडे आणि प्रसाद सावकार यांच्या भूमिका तंतोतंत सादर केल्या. या दोघांनी 'या भवनातील गीत पुराणे', 'तेजोनिधी लोह गोल' व 'घेई छंद मकरंद' ही गाणी फार तयारीने गाऊन लोकांना वेड लावले. त्या सुरांच्या वातावरणात प्रेक्षक धुंद होऊन आपापल्या घरी गेले.

रविवारी ३१ मेला मी माझ्या घरी परत गेले. परंतु परत जाताना गेले चार दिवस कसे गेले ते कळले नाही. राहून राहून असं वाटत होतं की असं संमेलन पुन्हा केव्हा इथे भरलं जाईल. ती महाराष्ट्रातील सर्व ओळखीची कलाकार मंडळी पुन्हा केव्हा अमेरिकेत भेटतील? त्यांच्याबरोबर मस्करी, त्यांच्याबरोबर ब्रेकफास्ट व लंच घेतानाचे क्षण, सर्वकाही महाराष्ट्रीयन वातावरण, जणूकाय मी महाराष्ट्रातच आहे असा एकसारखा मला भास होत होता. त्या मराठी नाटकांच्या धुंदीमध्ये मी अमेरिकेला पार विसरून गेले होते.

---

**प्रतिक्रिया**

# एक मनोगत

**-सुबोध प्रधान**

प्रत्युश २००९ आणि प्रत्युश २०१० हे दोन बहारदार कार्यक्रम पाहिले आणि आठवणींच्या लंबकाने एक मोठी झेप २०-२५ वर्षे मागे घेतली.

हाच उल्हास, हाच जल्लोष, हाच उत्साह भरलेला होता. आणि तो म्हणजे 'प्रभुप्रभात'ने आयोजित केलेले बाल भवन मेळावे. हे मेळावे म्हणजे लहान मुलांचे हसणे बागडणे, नाचणे.

त्यावेळी मुलांच्या नाट्यस्पर्धा आयोजित केल्या जात असत. मी स्वतः गिरगाव केंद्रातून, माझी बहीण इनाक्षी खार केंद्रातून, तर कुंदन आगासकर दादर केंद्रातून नाटिका सादर करीत असत. बक्षिसाला विशेष महत्त्व नव्हतं. परंतु मुलांचा उत्साह जास्त महत्त्वाचा होता. ह्या स्पर्धेबरोबरच भांगडा, दांडिया असे डान्सचे कार्यक्रमही सादर केले जात असत. आणि नृत्याची ही जबाबदारी वंदना राणे उचलीत असे.

आम्ही पहिल्या वर्षी 'चिमणा बांधतो बंगला' ही नाटिका गिरगाव केंद्रातून सादर केली. इनाक्षीने खार केंद्रातून 'बाबा हरवले आहेत' ही नाटिका सादर केली, तर कुंदन आगासकरने दादर विभागातून नाटिका सादर केली. दुसऱ्या वर्षी 'झाली काय गंमत' ही नाटिका सादर केली. तर कुंदन आगासकरनेही दादर केंद्रातून एक सुंदर बालनाट्य सादर केले. ह्या नाटिकांच्या बरोबर नृत्य, नकला असा भरगच्च कार्यक्रम असे.

१ मे हा बालभवनचा दिवस ठरेलला असे. मार्च महिना संपला की मुलांची लाईन लागायची. नाटकाची तालीम कधी सुरू करायची? आताचा हा 'प्रत्युश' पाहताना ते मंतरलेले दिवस आठवले. आम्ही जशी कार्यक्रमाची बाजू सांभाळत होतो त्याच वेळेस आमच्या बाजूला दुसऱ्या मुलांची म्हणजेच स्वयंसेवकाची भक्कम भिंत उभी होती आणि ती म्हणजे जतिंद्र वाझकर, बेला कोठारे, तुषार कोठारे, नंदा राणे, मेघा राणे, बीना कीर्तिकर आणि चंदु वैद्य. आपल्याला माहित आहे की, कार्यक्रमासाठी कुठलेही सोंग घेता येते. परंतु पैशाचं सोंग कधी घेता येत नाही. ही सर्व मुलं घरोघरी फिरून डोनेशन गोळा करीत असत. जेवणाखाण्याची पर्वा न करता, कोणाची कसलीही तक्रार नसे.

परंतु हे मंतरलेले दिवस वाऱ्याबरोबर उडून गेले. कारण अकस्मात हे कार्यक्रम बंद झाले आणि त्याजागी बाहेरची व्यावसायिक नाटके घेणे सुरू झाले. सर्वजण बालभवन मेळावे विसरून गेले आणि बघता बघता एक सबंध पिढी डोळ्यासमोर मोठी झाली आणि ह्या कार्यक्रमांना वंचित झाली. 'चिमणा बांधतो बंगला'मध्ये चिमणीचं पिल्लू झालेली भक्ती परवा स्टेजवर बघून खूप बरं वाटलं. आमचं नाटक कधी करणार म्हणून माझ्या मागे लागायची. परंतु नाटकाला किंवा मुलांच्या कार्यक्रमाला पर्यायच उरला नव्हता.

मध्यंतरीच्या काळात सोशल समाजाचेही कार्यक्रम बंद झाले होते आणि त्यामुळे मुलांना रंगमचच उपलब्ध नव्हता. ही खंत गेली अनेक वर्षे वाटत होती. परंतु गेली दोन वर्षे 'प्रत्युश'च्या आयोजकांनी त्यावर फुंकर घालून मनाला खूप मोठा दिलासा, समाधान आणि आनंद दिला आणि मुलांच्या कलागुणांना वाव दिला.

प्रभुतरुणाच्या युवामंचाच्या कार्यकर्त्यांना कळकळीची विनंती आहे की हा कार्यक्रम सतत चालू ठेवा. त्यात खंड पडू देऊ नका आणि चिमण्या कलाकारांचा आनंद हिरावून घेऊ नका. 'प्रत्युश'च्या संयोजकांचे, दिग्दर्शकाचे, तंत्रज्ञांचे आणि कलाकारांचे अभिनंदन. अभिनंदन. त्रिवार अभिनंदन.

करी मनोरंजन जो **आमचे** जडेल नाते प्रभुशी तयाचे.

धन्यवाद.

---

(जागेअभावी 'शिदोरी' सदर पुढील अंकी -संपादक)

## प्रभुतरुणास देणगी

❀ सौ. जयश्री आणि श्री. माधव गजानन जयकरकडून रु. १०५/-

❀ श्री. प्रकाश ड़ी. जयकरकडून आजीव सदस्यत्व रु. ३५०/-

❀ श्री. मीनलकुमार मनोहर तळपदेंकडून आजीव सदस्यत्व रु. ३५०/-

❀ श्री. राजन प्रधान यांजकडून पुत्र श्री. रोहन यांच्या साखरपुड्यानिमित्त रु. १०१/-

## परीक्षेतील सुयश

### शालांत परीक्षा (दहावी)

प्रथमेश राजेश धुरंधर, ९१.८२ %

अमोल अमित धैर्यवान, ७० %

गंधाली संजय दळवी, ८१ %

अभिजित प्रकाश जयकर, ९२.१८ %

सिद्धांत समीर धुरंधर, ७४.९१ %

### बारावी

श्री नीलेश कोठारे, ८१%

### टी.वाय.बी.कॉम्

कृतिका सुधांशु व्यवहारकर, ८६.४२%

### एम. बी.ए. (बोस्टन, यूएसए.)

डॉ. तेजस प्रकाश माधव नायक, प्रथम वर्ग

## अभिनंदन

❀ आमचे लेखक श्री. नंदकुमार विजयकर यांच्या 'सल-शिरा' या पुस्तकाची महाराष्ट्र राज्य ग्रंथनिवड समितीने राज्यस्तरीय ग्रंथालयाकरिता शिफारस केली आहे.

❀ कार्यकारी संपादिका असलेल्या मिनाक्षी जयकर यांचा सुपुत्र शौनक कौशिक जयकर याला माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तम गुण प्राप्त होऊन तो शिष्यवृत्तीचा मानकरी ठरला.

❀ चारशे मीटर्सच्या महाराष्ट्र स्टेट अॅथेलेटिक मीट फायनल्समध्ये संजना सुदीप धराधर यांना 'ब्रॉन्झ पदक' प्राप्त झाले.

❀ स्वरूपा राणे देवरूखकर यांचा सुपुत्र श्री. सागर यांनी 'लेज'ची आंतरदेशीय स्पर्धा जिंकून प्रथम क्रमांक पटकावला.

❀ ब्लॅक स्वान' तर्फे प्रकाशित झालेल्या 'मायबोली मराठी' या पुस्तकावर लोकसत्तेत परीक्षण आले. त्यात संपादक म्हणून डॉ.सुमन नवलकर यांच्या परिश्रमाचा कौतुकपूर्ण उल्लेख आहे.

## पाठारे प्रभु महिला समाज

महिला समाजाचा ९६ वा स्थापना दिन शनिवार, दि. २५ सप्टेंबर २०१० रोजी दुपारी ४ वाजता पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात गायत्री मंदिराशेजारी प्रभुनगर, १२ वा रस्ता खार (प.) येथे संगीत व नृत्य स्पर्धा घेऊन साजरा करण्यात येईल. नृत्यस्पर्धा सभासदांच्या मुलामुलींसाठी घेण्यात येणार आहे. भाग घेणाऱ्या स्पर्धकांनी ३.३० वा.येणे.

१) संगीत स्पर्धा- (महिलांसाठी)
विषय-मराठी सिनेसंगीत
मुलींसाठी (१५ वर्षांखालील)
विषय-मराठी सिनेसंगीत
(पाठांतर आवश्यक, पेटी व तबला उपलब्ध, वेळ ३ ते ५ मिनिटे)

२) नृत्य स्पर्धा
मुली-५ ते ९ वर्षे, १० ते १५ वर्षे
मुले- ५ ते ९ वर्षे, १० ते १५ वर्षे
महिला- १६ ते २५ वर्षे, २६ ते ४० वर्षे
विषय- चित्रपट गातीवरील रेकॉर्ड डान्स
वेळ ३ ते ५ मिनिटे
(कॅसेट प्लेअरची व्यवस्था केली जाईल)

उत्कृष्ट नृत्याविष्कार व नृत्यदिग्दर्शकालाही पारितोषिक दिले जाईल.)

## पाठारे प्रभु सोशल समाज

पाठारे प्रभु सोशल समाजाची 'वर्षा सहल' ११ जुलै रोजी 'स्वाद रिसॉर्ट' केळवे माहिम, ह्या निसर्गरम्य स्थळी असलेल्या रिसॉर्टमध्ये आयोजित केली होती. गतवर्षीपेक्षा ह्या वर्षी ४० टक्क्याहून अधिक जास्त उपस्थिती होती. कार्यकारिणीचे सुंदर आयोजन, वेळेवर सुटलेली आरामदायी बस, भरपेट नास्ता, दुपारी मनपसंत सामिष भोजन, समुद्रावर फेरफटका, हौजी व इतर खेळ त्यामुळे उपस्थितांनी त्या दिवशी सहलीचा मनमुराद आनंद लुटला. येताना वाटेत 'भजनसन्स' ह्या दुग्धशाळेला देखील भेट दिली. अशा ह्या सबंध दिवसाच्या भरगच्च कार्यक्रमामुळे खुश होऊन परतीच्या प्रवासात आपापल्या थांब्यावर उतरताना पुढील वर्षी देखील येणारच नव्हे; नातेवाईक व मित्रांनापण घेऊन येणार अशी ग्वाही देत ते आपापल्या घरी परतले.

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### नारळसाखर दिला

२६-६-१० श्री. रोहन राजन प्रधान कु. पूजा अविनाश जोशी (आंतर्ज्ञातीय)

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०६-७-१० | श्रीमती मोहिनी मनोहर तळपदे, | वय ८८, | खार |
| १३-७-१० | श्रीमती उमा मधुकर सुंदरराव राणे, | वय ८३, | खार |
| १३-७-१० | श्री. पद्मकुमार परमानंद कोठारे, | वय ८० | खार |
| २४-७-१० | श्री. निशीकांत वासुदेव जयकर, | वय ७०, | कांदिवली |
| ०५-८-१० | श्री. विनायक माधवराव देसाई, | वय ८८, | ठाणे |

## पाठारे प्रभू चॅरिटीज

दिनांक ७ ऑगस्ट २०१० रोजी ठाकूरद्वारच्या श्री व्यंकटेश मंदिरात श्री साईबाबा, श्री खंडोबा आणि श्री शीतलादेवी यांची दिमाखात प्रतिस्थापना झाली. सकाळी आठ वाजल्यापासून सोहळा सुरू झाला. 'पूर्णाहुती' झाली. भक्तभाविकांना एकाच ठिकाणी सर्व देवतांचा दर्शनलाभ व्हावा म्हणून चॅरिटीजने उचललेले हे पाऊल स्वागतार्ह आहे. भर पावसात म्हणूनच ज्ञातीयांनी बहुसंख्येने आवर्जून हजेरी लावली. उपस्थितांना महाप्रसादाचे भोजन देऊन या सोहळ्याची सांगता झाली.

(पान ५ कॉलम ४ वरून)

रेटतो आहे. ते सुद्धा कदाचित अशाच कुठल्यातरी बाहेरून आलेल्या ``Business Tycoon''च्या कंपनीत नोकरी करून.

थोडक्यात म्हणजे सध्या बाहेरून आलेलेच मुंबईकर बनू पाहताहेत आणि मूळ मुंबईकर शोधावा लागेल. कुणी शोधून आणेल काय?

हे सर्व लिहिण्यामागचे कारण म्हणजे आज आपला प्रभू समाज विखुरला आहे त्याला एकत्र येण्याची गरज आहे. मला असे वाटते की, आपण आत्ताच ह्याचा विचार केला पाहिजे आणि शक्य झाल्यास संघटीत होऊन आपल्याला खऱ्या अर्थाने मुंबईकर असल्याचे सिद्ध करून ह्या तमाम लोकांच्यात भूमीपुत्राचा हक्क आपल्याकडेच ठेवण्याचे प्रयत्न करायला हवेत. घे पाऊल पुढे जरा.... ●

**श्री स्वामी समर्थ होममेड फूड प्रॉडक्टस्**

सणासुदीकरिता आणि आपल्या घरातील/ऑफिसातील लहान-मोठ्या समारंभाकरिता व्हेज, नॉनव्हेज जेवणाची ऑर्डर स्वीकारली जाईल.

उपवासाकरिता वरीचे (इंस्टंट) पीठ, फणसाचे कुरकुरीत गरे.

खास गणपतीकरिता कंदी पेढे, कंदी मोदक.

दिवाळीकरिता भाजणीची तेल काढलेली (डायट) चकली, मेथीपुरी, कांदाशेव, बेक्ड गोड शंकरपाळे, पालकशेव, काजूपोळी (१०० टक्के काजूची), खजूरपोळी, तेलपोळी, इंस्टंट मिसळ, नानकटाई, गव्हाचा चिवडा, पॉपकॉर्न चिवडा, व्हॅनिला केक, पंगोजीचं पीठ आणि असेच खादाडीचे नवनवीन पदार्थ मिळण्याचे विश्वसनीय एकच नाव -

**स्वामीसमर्थहोममेडफूडप्रॉडक्टस्**

*संपर्क:-*

**केदार सुधाकर गोरक्षकर**
**९८१९१७६९९९**
**सौ. अनघा केदार गोरक्षकर**
**२०३२०१०४**

*JOGESHWARI RESORT*

**SANITORIUM**

Under ISHWARI & VIDYADHAR CHARITABLE TRUST No. 14, Divya Hilltop Cottages, Nangargaon, LONAVALA.

Fully furnished Double Bedroom Hall & Kitchen Units Equipped with Gas, Stove, Utensils and Refrigerators available on daily charge basis.

Special concessions available on request for Womens' and Children's Institutions, Aged, Disabled or for other justifiable reasons and medical certificates. Booking made on phone as below. Also available, at the Mumbai address, Wheel Chair, Walkers, Crutches, against refundable deposits only.

Trustees: PRAMILA & MADHUKAR TALPADE
102, ``PRIYA'' Raviraj Oberoi Complex, SAB T. V. Lane,
New Link Road, Andheri(W), Mumbai-400 053.
Tel.: 2630 3902/2630 3906 Mobile: 9821447675
Booking Mobile: 09823884094/09422543614

*॥ श्री इंद्रायणीप्रसन्न ॥* *॥ श्री गुरुदेव दत्त ॥*

**प्रकाश कॅटरर्स**

*शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!*

*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम स्वाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा! विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो. खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :

**प्रवीण धुरंधर**

डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.

फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८